दिनांक १३/०३/२०२२

# -:- प्रेसनोट -:-

फिर्यादी यांचे मुकूंदनगर येथील मारोती मंदिरच्या सभागृहाचे केलेल्या बांधकामाचे बील काढुन देण्यासाठी आरोपी लोकसेवक श्री.संजय राजाराम पाटील, वय 52 वर्षे, पद-शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यालय पदमपुरा औरंगाबाद रा. डी-1, गुरुगणेश अपार्टमेंट, रिध्दी सिध्दी हॉलच्या बाजुला उल्कानगरी औरंगाबाद (वर्ग -2) यांनी रुपये 1,25,000/-लाचेची मागणी करुन, तडजोडअंती रुपये 40000/- लाचेची रक्कम स्विकृती केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा नोंद क्रं. | :- | पोलीस ठाणे जवाहरनगर औरंगाबाद शहर गु.र.नं.74/2022 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री.संजय राजाराम पाटील, वय 52 वर्षे, पद-शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यालय पदमपुरा औरंगाबाद रा. डी-1, गुरुगणेश अपार्टमेंट, रिध्दी सिध्दी हॉलच्या बाजुला उल्कानगरी औरंगाबाद (वर्ग -2) |
| लाच मागणी रक्कम | :- | 1,25,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 40000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. गोरखनाथ गांगुर्डे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांनी मुकूंदनगर येथील मारोती मंदिर सभागृहचे बांधकाम केलेले असून सदर बांधकामाचे बील काढुन देण्यासाठी आ.लो.से. यांनी रुपये 1,25,000/- ची मागणी करित असल्याने तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. 10/03/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>फिर्यादी यांचे तक्रारीवरुन दि.11/03/2022 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. यांनी फिर्यादी यांना रुपये 1,25,000/ मागणी करुन तडजोडीअंती रुपये 100000/- स्विकारण्याचे मान्य करुन एक लाख रुपयापैकी रुपये 50,000/- लाचेची रक्कम दि. 12/03/2022 रोजी फोन करुन देण्यास येण्याबाबत सांगितले बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे दि. 12/03/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता, सापळा कार्यवाहीसाठी तक्रारदार यांचेकडे आलोसे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी रुपये 40000/- असल्याने आरोपी लोकसेवक श्री. पाटील, यांनी उल्कानगरी येथील रिध्दी सिध्दी हॉल समोरील रोडवर पंचासमक्ष लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम 40000/- रुपये स्विकारल्यानंतर आ.लो.से. यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन जवाहरनगर औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडीत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक- श्री. गोरखनाथ गांगुर्डे, यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोअं- दिगांबर पाठक, शिरीष वाघ, अशोक नागरगोजे, चंद्रकांत बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net फेसबुक:- www. facebook. com-Maharashtra.gov.in

संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064, पोलीस अधीक्षक :- 8888807299

पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994


पोलीस उप अधिक्षक कार्यालय * अँटी करप्शन ब्युरो औरंगाबाद * सत्यमेव जयते

(मारुती पंडीत)
**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद**